सर्व भारत वासियांना प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !
प्रजासत्ताक दिन चिरायू होवो...

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १६५
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, रविवार, दि.२६ जानेवारी २०२५

**✲ निवेदन ✲**

आज दि.२६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त दैनिक अक्षराज च्या कार्यालयाला सुट्टी असल्याने उद्या दि.२७ जानेवारी २०२५ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची सर्व वाचक, लेखक, हितचिंतक, जाहिरातदार, वृत्तपत्र विक्रेते/एजंट यांनी नोंद घ्यावी.

**संपादक**
**अक्षराज मीडिया**

## धक्कादायक ! तब्बल ५ तास आठही मृतदेह एकाच जागी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, भंडारा :** जवाहरनगर आयुध निर्माण करणाऱ्या कारखान्यामध्ये शुक्रवारी झालेल्या भीषण स्फोटात आठ जणांना प्राण गमवावे लागले, तर पाच जण गंभीर जखमी झालेत. आज अंत्यसंस्कार करण्यापूर्वी आठही मृतदेह कंपनीच्या मुख्यप्रवेश द्वराजवळ असलेल्या शेडमध्ये आणण्यात आले. एकाच रांगेत आठ मृतदेह. मन उद्विग्न करणारे ते दृश्य. स्फोटानंतर मृतांचे नातेवाईक व गावकऱ्यांच्या संतापाचा भडका उडाला आणि घटनास्थळी मोठा तणाव निर्माण झाला.

जोवर लिखित स्वरूपात मागण्या पूर्ण होणार नाही तोवर मृतदेह हलवणार नाही, असा आक्रमक पवित्रा कुटुंबीयांसह हजारोंच्या संख्येने जमलेल्या लोकांनी घेतला. कंपनीकडून मागण्या पूर्ण करण्याचा शब्द दिला जात नसल्याने तब्बल पाच तास आठही मृतदेह ठेवण्यात आले. यावेळी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. भंडाऱ्याच्या



जवाहरनगर येथील आयुध निर्माण कंपनीत काल २४ जानेवारी रोजी भीषण स्फोट झाला. या दुर्घटनेत आतापर्यंत ८ कामगारांना आपला जीव गमवावा लागला तर, पाच कामगार मृत्यूशी झुंज देत आहेत. मृताच्या नातेवाईकांनी आणि गावकऱ्यांच्यानी शनिवारी सकाळी कंपनीच्या प्रवेशद्वारासमोर ठाण मांडत मागण्या पूर्ण होईपर्यंत मृतदेह घरी नेणार नसल्याची आक्रमक भूमिका घेतली आहे. यावेळी कंपनीच्या अधिकाऱ्यांना धक्काबुक्की देखील करण्यात आली. त्याच वेळी आमदार, खासदार यांच्यासमोरच 'मुर्दाबाद'च्या घोषणा देण्यात आल्या. मागण्यांच्या पूर्ततेनंतर मृतदेह अंत्यसंस्कारासाठी नेण्यात आले.

**मृतांचे नातेवाईक व गावकऱ्यांच्या मागण्या...**

आयुध निर्माणी कंपनीविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंदवावा. मृत कामगारांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत, तसेच कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरी देण्यात यावी.

साहुली गावाचे पुनर्वसन करा.

**घटनेच्या चौकशीसाठी एसआयटी गठीत...**

या घटनेची संपूर्ण चौकशी व्हावी, यासाठी भंडारा जिल्हा पोलीस अधीक्षक नुरुल हसन यांनी नऊ सदस्यीय एसआयटी गठीत केली आहे. या एसआयटीत आयुध निर्मिणी कंपनीतील कुणाचाही समावेश नसल्याने ही चौकशी समिती निष्पक्षपणे चौकशी करेल, असा विश्वास पोलीस अधीक्षकांनी व्यक्त केला.

**३० लाखांची मदत !**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेवर दुःख व्यक्त केले. दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाच लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याची घोषणा केली. सोबतच कंपनीच्या मुख्य व्यवस्थापकीय संचालकांनी आयुध निर्माणीकडून २५ लाखांची मदत जाहीर केली.

## जुने झाड रिक्षावर पडल्याने रिक्षाचालकाचा मृत्यू

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२५, डोंबिवली (ठाणे) :** डोंबिवली एमआयडीसी परिसरात एका जुन्या गुलमोहराच्या झाडाचा काहीसा भाग कोसळल्याने रिक्षावर जाऊन आदळला. या अपघातात रिक्षाचालकाचा मृत्यू झाला. मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव रामदिन लोदी असे असून ते ६० वर्षाचे होते. पोलिसांनी या घटनेची दखल घेत अपघाती मृत्यूची नोंद केली आहे. या दुर्घटनेनंतर स्थानिक नागरिकांतून मोठ्या प्रमाणात रोष व्यक्त केला जात आहे. त्यांनी एमआयडीसी परिसरातील अशा जुन्या आणि धोकादायक झाडांची तपासणी करून लवकरात लवकर कारवाई करण्याची मागणी केली आहे, जेणेकरून अशा दुर्दैवी घटनांना आळा घालता येईल. रामदिन लोद यांच्या निधनामुळे त्याच्या कुटुंबावर शोककळा पसरली आहे. नागरिकांकडून त्यांच्या कुटुंबीयांसाठी मदतीची मागणी केली जात आहे. स्थानिक प्रशासन आणि संबंधित विभागाने या प्रकरणाची त्वरित दखल घेऊन योग्य ती उपाययोजना करावी, असे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे.

## लेंडी प्रकल्पाच्या निधीसाठी तेलंगना प्रशासकिय अधिकारी व नांदेडच्या भूमिपुत्राचा पुढाकार

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२५, नांदेड :** नांदेड जिल्ह्याच्या मुखेड व देगलूर तालुक्यांसह तेलंगणा राज्याच्या काही भागातील जलसिंचनासाठी वरील प्रकल्पाची निर्मिती होत असून पुनर्वसन, धरण आणि कालवे या तीन प्रकारांतील नियोजित कामांसाठी तेलंगणा राज्याकडून २१८ कोटी रुपये येणे बाकी आहे. यासाठी नांदेडचे खासदार रवींद्र चव्हाण यांनी हैदराबाद येथे तेलंगणा राज्यातील पाटबंधारे व लाभ क्षेत्र खात्याचे सचिव प्रशांत पाटील यांची भेट घेतली. त्यानंतर खऱ्या अर्थाने सूत्र हलायला सुरुवात झाली.

प्रशांत जीवनराव पाटील पानपट्टे हे मूळचे कंधार तालुक्यातील काटकळंबा येथील असल्याकारणाने आपल्या जिल्ह्यासाठी प्रलंबित असलेला लेंडी प्रकल्पासाठी सकारात्मक पावलं उचलण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहे. नांदेडचे खासदार रविंद्र चव्हाण यांनी तेलंगणाचे उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री विक्रमाबट्टी आणि जलसंपदा मंत्री उत्तमकुमार रेड्डी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन चर्चा केली. यावेळी सचिव प्रशांत पाटील उपस्थित राहून योग्य ती माहिती देऊन हा प्रकल्प दोन्ही राज्यांसाठी आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी कशा फायदेशीर होऊ शकतो. यासंबंधी माहिती दिली. कंधार तालुक्यातील भुमिपुत्र हे तेलंगणा राज्यांमध्ये संबंधीत विभागात वरीष्ठ पदावर कार्यरत असल्यामुळे निश्चितच लेंडी प्रकल्पाचा प्रलंबित निधी जिल्ह्याला मिळेल ही अपेक्षा जनसामान्यांमध्ये व्यक्त होत आहे.

## मानवीय गुणांनी युक्त असणे हीच मानवाची खरी ओळख – माता सद्गुरू सुदीक्षाजी महाराज

**अक्षराज : वृत्तसंकलन**



**दि.२५, पिंपरी (पुणे) :** मनुष्य रूपात जन्म प्राप्त केल्यानंतर मानवीय गुणांनी युक्त असणे हीच मानवाची खरी ओळख आहे, असे मत माता सद्गुरू सुदीक्षाजी महाराज यांनी व्यक्त केले. पिंपरीतील मिलिटरी डेअरी फार्म येथे संत निरंकारी मिशनद्वारे आयोजित ३ दिवसीय ५८ व्या निरंकारी संत समागमाचा शुक्रवारी शोभायात्रेने शुभारंभ झाला. त्या वेळी त्या बोलत होत्या. या समागमामध्ये महाराष्ट्रासह देश–परदेशातील भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. सद्गुरू सुदीक्षाजी महाराज म्हणाल्या, 'विज्ञान व तंत्रज्ञानाच्या आधारे सांसारिक उपलब्धीच्या बाबतीत मानवाने प्रगती आणि विस्तार केला आहे. सद्बुद्धीने युक्त होऊन या उपलब्धीचा वापर केला जातो, तेव्हा तो निश्चितच मानवासाठी शांती–सुखाचे कारण बनतो.

परंतु, जर यांचा सदुपयोग केला नाही, तर त्या उपलब्धी मानवासाठी नुकसानकारक ठरतात. ब्रह्मज्ञानाद्वारे जेव्हा परमात्म्याला जीवनात उतरविले जाते. तेव्हा मानवाला सद्बुद्धी प्राप्त होते. त्याच्या मनातील द्वेषभावना, स्वार्थीपणा संपतो. प्रत्येक मानवासाठी त्याच्या मनात परोपकाराची भावना निर्माण होते. मानवाने शुद्ध भावनेने या परमात्म्याला आपल्या हृदयामध्ये स्थान द्यावे.' समागमस्थळी सद्गुरू सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिता रमितजी यांचे आगमन होताच भव्य शोभायात्रा काढण्यात आली. भारताच्या वेगवेगळ्या संस्कृतींचे दर्शन घडविणाऱ्या चित्ररथाने सर्वांचे लक्ष वेधले. या शोभायात्रेत मिशनची विचारधारा, आध्यात्मिकतेचे महत्त्व, मानव एकता व विश्वबंधुत्वाच्या भावनेचा विस्तार यावर प्रकाश टाकण्यात आला.

## आता जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२५, मुंबई :** राज्यातील गरजू रूग्णांना आर्थिक सहाय्य करण्याकरिता राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष सुरू करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पहिल्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात गरजूंना अत्यावश्यक आरोग्यसेवा व आर्थिक सहाय्य देण्याकरिता मंत्रालयात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष कार्यरत करण्यात आला होता.दरम्यान हीच वैद्यकीय सेवा नागरिकांना त्यांच्याच जिल्ह्यात सहजपणे उपलब्ध व्हावी अशी सूचना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केली होती. त्यानुसार राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष सुरू करण्याचा शासननिर्णय काढण्यात आला आहे.

या कक्षात सादर झालेल्या अर्जाचा पाठपुरावा करण्यासाठी रुग्ण व त्यांचे नातेवाईक मंत्रालयात येत असतात. या निर्णयामुळे नागरिकांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या प्रकरणांची माहिती त्यांच्याच जिल्ह्यात उपलब्ध होणार आहे, असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या मार्गदर्शनानुसार मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे कामकाज अधिक सुलभ व पेपरलेस करण्यात येत आहे. महागड्या वैद्यकीय उपचारांसाठी गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना आर्थिक मदत मिळविण्याची प्रक्रिया पूर्णतः पेपरलेस करण्यात येणार असून या प्रक्रियेसाठी मंत्रालयात येण्याची आवश्यकता राहणार नाही. याकरिता लवकरच स्वतंत्र ऑनलाइन प्रणाली विकसित करण्यात येणार असल्याची माहिती श्री. नाईक यांनी दिली आहे. यामुळे नागरिकांचा वेळ व खर्च टाळता येणार आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या माध्यमातून गंभीर आजारांवरील उपचारांसाठी गरजू नागरिकांना अत्यावश्यक आर्थिक मदत केली जाते. या सेवांचा मोठ्या प्रमाणावर लाभ घेणे सहज सुलभ व्हावे यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष सुरू करण्यात येणार आहे. संबंधित जिल्ह्यातील मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षास प्राप्त झालेल्या अर्जांची सद्यस्थिती नागरिकांना उपलब्ध करुन देणे व समस्यांचे निराकरण करणे, कक्षामध्ये आलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांना अर्ज भरण्यास सहाय्य करणे, मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून आर्थिक मदत झालेल्या रुग्णांची रुग्णालयात जाऊन भेट घेणे, मुख्यमंत्री सहाय्यता निधी



कक्षाबाबत जनजागृती आणि प्रसिध्दी करणे, जिल्ह्यातील आपत्तीच्या ठिकाणी भेटी देणे तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामार्फत अर्थसहाय्य देण्याकरिता आजारांचे पुनर्विलोकन करणे व अर्थसाहाय्याची रक्कम नव्याने निर्धारित करणे याकरिता राज्यातील तज्ञ डॉक्टरांची समिती स्थापन करण्यात आली आहे. यामुळे अर्थसहाय्य देण्यात येणाऱ्या आजारांच्या संख्येत वाढ करण्यात येणार असून उपचारांचा खर्च दिवसेंदिवस वाढत असल्याने अर्थसाहाय्याच्या रकमेचा देखील समितीमार्फत आढावा घेण्यात येणार असल्याचे श्री. नाईक यांनी सांगितले.

मुख्यमंत्री कार्यालयातील मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षा कडून अनेक दुर्धर आजारांवरील उपचारांसाठी येणाऱ्या खर्चाकरीता रुग्णांना आर्थिक सहाय्य केले जाते. तसेच आपत्ती प्रसंगीही आर्थिक मदत देण्यात येते. या अनुषंगाने मदत मिळविण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामध्ये असंख्य अर्ज प्राप्त होतात. रुग्णांना अधिक सोयीस्कर सेवा उपलब्ध करून देण्यासाठी धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष ऑनलाईन प्रणाली (चॅरिटी पोर्टल) आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष ऑनलाईन प्रणाली (सीएमआरएफ पोर्टल) एकत्रित जोडण्यात येणार आहेत. सद्याच्या प्रचलित कार्यपद्धतीप्रमाणे रुग्णाला दिला जाणारा एओ क्रमांक आणि एम क्रमांक एकत्र करण्यात येणार आहे. या सुविधेमुळे निधीच्या अर्जाची प्रक्रिया अधिक गतिशील, सोपी होणार आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाने आतापर्यंत राज्यातील हजारो गरजू रुग्णांना जीवनदान दिले आहे. दुर्धर आणि महागड्या आजारांवरील उपचारांसाठी आर्थिक सहाय्य मिळाल्याने अनेक कुटुंबांना आधार मिळाला आहे. राज्य शासनाच्या या उपक्रमामुळे राज्यातील आरोग्यसेवा अधिक सक्षम आणि लोकाभिमुख होईल, अशी अपेक्षा व्यक्त करत असताना कक्षाच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या सुविधांचा गरजू रुग्णांनी अधिकाधिक प्रमाणात लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. नाईक यांनी केले आहे.

## निवडणूक आयोगाच्या संदिग्ध भूमिके बद्दल काँग्रेस आक्रमक !

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२५, मुदखेड (नांदेड) :** विधानसभा निवडणूकीत पन्नास लक्ष वाढलेली मतदारसंख्या तसेच मतदानाच्या दिनी रात्री वाढलेली शहात्तर लक्ष मते तसेच यासंदर्भातील बुथवरील व्हिडीओ फुटेज देण्यासाठी निवडणूक आयोग टाळाटाळ करीत असल्याने मुदखेड तालुका व शहर काँग्रेसच्या वतीने आक्रमक भूमिका घेत निवडणूक प्रक्रियेचा निषेध व्यक्त करण्यात आला असून या संदर्भातील निवेदन पत्र तहसील प्रशासनास देण्यात आले. महाराष्ट्र राज्यात विधानसभा निवडणुकी दरम्यान अनपेक्षित निकाल लागल्याने सर्वच राजकीय विश्लेषकांचे आणि जनतेचाही विश्वास बसत नव्हता. लोकसभा निवडणुकीच्या नंतर राज्यात वाढलेली एकाएकी ५० लक्ष मतदारांची नोंदणी सर्वांनाच आश्चर्यचकित करणारी आहे. या शिवाय मतदानाच्या दिनी सायंकाळी ५ ते ११ दरम्यान झालेले ७६ लक्ष मतदान याविषयी संभ्रम निर्माण झाला असून संबंधित



मतदानाचे व्हिडीओ फुटेज आता मिळणार नसल्याचे निवडणूक आयोग व केंद्र सरकारने सांगितले असल्याने संपूर्ण मतदान प्रक्रियेवर संदिग्धता निर्माण झाली आहे. या विरोधात खा. रवींद्र चव्हाण, जिल्हाध्यक्ष बी आर कदम यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात तहसील प्रशासनाला लेखी निवेदन देण्याचे आदेश देण्यात आले होते.

मुदखेड तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने शनिवार, दिनांक २५ जानेवारी २०२५ रोजी तहसील प्रशासनास लेखी निवेदन देण्यात आले. तहसील प्रशासनाच्या वतीने विश्वनाथ बोधमवाड यांनी काँग्रेसचे निवेदन स्वीकारले. यावेळी तालुका काँग्रेस अध्यक्ष प्रताप देशमुख बारडकर, काँग्रेस शहराध्यक्ष कैलास गोडसे, कार्याध्यक्ष मोहमद गौस, युवक शहराध्यक्ष मुजिब पठाण, माजी नगराध्यक्ष राजबहादुर कोत्तावार, प्रा.संदीपकुमार देशमुख, माजी उपनगराध्यक्ष लक्ष्मण देवदे, करीम खाँ जिल्हा उपाध्यक्ष राजू चौदंते, जिल्हा प्रवक्ते श्रीनिवास महादवाड, अतिक अहमद, सचिव माधव हामंद, उपाध्यक्ष दादाराव पाटील कल्याणे, लतीफ टेलर, आकाश सोनटक्के, सरपंच साहेबराव गोरखवाड, संजय बोकेफोड, यशवंत रणखांबे, अविनाश चौदंते, ऋषिकेश चौदंते, भगवान पवार, राजेश पवार, वेदांत शेवटे, नागोराव भांगे पाटील, गजानन संभोड, इकबाल कुरेशी, राधेश्याम ढगे, सुरेश ढगे, मोहम्मद युसूफ, मोहीम भाई, खदीर भाई, सूर्यकांत चौदंते, आदी काँग्रेसचे कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

# संपादकीय



## डिजिटल विद्यापीठ !

सध्या उच्च शिक्षणात जागतिक पातळीवर अभूतपूर्व वेगाने बदल होताना आपल्याला दिसत आहे, हे मुख्यत्वे विद्यार्थ्यांच्या आणि जागतिक कार्यबलाच्या सतत बदलत्या गरजांशी जुळवून घेण्यासाठी होत आहे. त्यात आता डिजिटल विद्यापीठाचा उदय होत आहे. डिजिटल विद्यापीठ ही एक अशी शैक्षणिक संस्था आहे जी जीवनाच्या सर्व स्तरावरील विद्यार्थ्यांना लवचीक सुलभ आणि उच्च गुणवत्तेचे शिक्षण देण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करते. हे विद्यापीठ इंटरनेट आणि संप्रेषण तंत्रज्ञानाद्वारे विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन अभ्यासक्रम प्रामुख्याने प्रदान करते. त्याबरोबर डिजिटल विद्यापीठे अनेकदा ऑनलाइन आणि प्रत्यक्ष शिक्षण अशा दोन्ही पद्धतीने विद्यार्थ्यांना अध्यापन करते. अशी विद्यापीठे विद्यार्थ्यांना जगभरातील शिक्षकांकडून शिकण्याची संधी देतात ज्यामुळे वैविध्यपूर्ण आणि सर्वसमावेशक शिक्षण वातावरण निर्माण होते. ही विद्यापीठे आजीवन शिक्षणाच्या संस्कृतीला प्रोत्साहन देतात आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या कारकीर्दीत त्यांची कौशल्ये व ज्ञान सतत विकसित करण्यात प्रोत्साहित करतात.

भारतात, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये (२०२०) अनेक शैक्षणिक सुधारणा सुचवल्या आहेत, त्यात विद्यार्थ्यांना त्यांच्या दाराशी वैयक्तिकृत अनुभवांसह जागतिक दर्जाचे सार्वत्रिक शिक्षण प्रदान करणे, हीदेखील शैक्षणिक सुधारणा सुचविली आहे. त्यासाठी डिजिटल विद्यापीठाची स्थापना करणे हे जरुरीचे ठरते. त्यादृष्टीने भारतात नॅशनल डिजिटल विद्यापीठ या पहिल्या डिजिटल विद्यापीठाची सुरुवात झाली आहे. केरळ युनिव्हर्सिटी ऑफ डिजिटल सायन्सेस इनोव्हेशन अँड टेक्नॉलॉजी हे भारतातील पहिले डिजिटल विद्यापीठ केरळ सरकारने २०२० मध्ये सुरू केले. विज्ञान, तंत्रज्ञान आणि मानव्य शास्त्रातील संशोधन आणि शिक्षणावर लक्ष केंद्रित करून देशातील ज्ञान क्रांतीचे प्रमुख प्रेरक बनणे हे या विद्यापीठाचे उद्दिष्ट आहे. महाराष्ट्रातही विद्यार्थ्यांना लवचीक, आकर्षक व दर्जेदार शिक्षण मिळावे या उद्देशाने डिजिटल विद्यापीठ स्थापन करण्याचे योजिले आहे. आज इंटरनेट, स्मार्टफोन व इतर डिजिटल उपकरणांच्या वाढत्या वापरामुळे ऑनलाइन शिक्षण देणे अधिक सुलभ झाले आहे तसेच विद्यार्थ्यांना लवचीक शिक्षण पर्यायाची गरज भासत आहे. ही डिजिटल विद्यापीठे कधीही व कुठेही अभ्यास करण्याची लवचीकता प्रदान करतात, त्यामुळे काम करणाऱ्या व्यावसायिकांना किंवा पालकांना, गृहिणींना आणि दुर्गम भागात राहणाऱ्यांना पण शिक्षण घेणे सुलभ होऊ शकते. पारंपरिक विद्यापीठातील शैक्षणिक शुल्कापेक्षा स्वस्त व परवडणारे शैक्षणिक कार्यक्रम ही विद्यापीठे देऊ शकतात.

परंतु, डिजिटल विद्यापीठाबद्दल काही प्रश्न उपस्थित होत आहेत. जरी विद्यापीठ अनुदान आयोगाने ऑफलाइन व ऑनलाइन या दोन्ही प्रकारच्या पदवींना समान महत्त्व दिले तरी ऑनलाइन पदवी ही नियमित पदवीइतकीच उपयुक्त ठरणार आहे का? नियोक्ते डिजिटल विद्यापीठाची पदवी प्राप्त करणाऱ्यांना नोकरी प्रदान करणार आहेत का? पारंपरिक शिक्षणात वर्गात विद्यार्थी व शिक्षकांची सुसंवाद व क्रियाकलाप, हे अध्यापन किंवा अध्ययन, ऑनलाइन शिक्षण पद्धतीपेक्षा अधिक प्रभावी करतात. तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने उच्च शिक्षणात, शिक्षक – विद्यार्थी गुणोत्तराचे प्रमाण १:२० वर आग्रही असताना ऑनलाइन पद्धतीत अमर्याद विद्यार्थी राहू शकतात, त्यामुळे विद्यार्थ्यांवर वैयक्तिक लक्ष देणे कितपत शक्य होईल, याबाबतही शंका उपस्थित होते. तसेच दुर्गम भागात खराब इंटरनेट कनेक्टिव्हिटी हीसुद्धा डिजिटल विद्यापीठासाठी मोठे आव्हान ठरू शकते.

# प्रजासत्ताक दिन .. औचित्य !

**२६ जानेवारी हा दिवस प्रत्येक भारतीय नागरिकांसाठी खुप अभिमानाचा, आनंदाचा असा खास दिवस आहे. 'प्रजासत्ताक दिन' म्हणून देशभरात हा दिवस' राष्ट्रीय सण' मानून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.**

बरेच जणांची प्रजासत्ताक दिन' आणि 'स्वातंत्र्य दिन' यात थोडीशी गल्लत होते. यातील फरक समजत नाही. आपल्याला फक्त ध्वजारोहण करणे आणि राष्ट्रगीत म्हणून भारत मातेला वंदन करणे या दोनच गोष्टी ठाऊक आहेत. म्हणूनच आज जाणून घेऊया स्वतंत्र दिन आणि प्रजासत्ताक दिन यामध्ये नेमका फरक काय आहे.

यातला साधारण फरक म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला देश स्वतंत्र झाला. म्हणजे इंग्रजांच्या गुलामीतून आपली सुटका झाली आणि भारताचा ध्वज देशभरात फडकावला गेला. तर २६ जानेवारी रोजी केला जातो तो प्रजासत्ताक दिन. २६ जानेवारी १९५० रोजी म्हणजे स्वातंत्र्य मिळाल्या नंतर साधारण तीन वर्षांनी भारतीय राज्यघटना देशभरात लागू करण्यात आली. देशातल्या प्रत्येक नागरिकाला त्यांचे हक्क मिळावेत यासाठी संपूर्ण भारतात संविधान लागू करण्यात आले.

१५ ऑगस्टला हिंदिभाषेमध्ये 'गणतंत्र दिन' असेही म्हणतात. सर्वांत महत्वाचे म्हणजे १५ ऑगस्ट या दिवशी' 'ध्वजारोहण' केले जाते. ध्वज म्हणजे झेंडा आणि आरोहण म्हणजे वर चढवणे. म्हणजेच आपला तिरंगा..राष्ट्रध्वज दोरीला बांधून खालून वरती नेला जातो आणि मग फडकवला जातो. ब्रिटिशांचा युनियन जॅक १५ ऑगस्टला खाली उतरवून भारताचा तिरंगा फडकवला होता म्हणूनच याला ध्वजारोहण करणे म्हणतात.

२६ जानेवारीला राष्ट्रध्वज आधीच दोरीने गुंडाळून वरती चढवलेला असतो. फक्त दोरीने ओढून तो फडकवला जातो. म्हणून याला झेंडा फडकावणे असे म्हणतात.

१५ ऑगस्ट रोजी देशाचे पंतप्रधान लाल किल्ल्यावरून ध्वजारोहण करतात, कारण पंतप्रधान हा देशाचा राजकीय प्रमुख असतो. लाल किल्ल्यावर स्वातंत्र्य दिनाचे आयोजन केले जाते कारण १५ ऑगस्ट १९४७ रोजी जेव्हा देश स्वतंत्र झाला तेव्हा भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी दिल्लीतील लाल किल्ल्यावर असलेल्या लाहोरी गेटच्या माथ्यावरून भारतीय ध्वजारोहण केले होते. तर २६ जानेवारी रोजी राष्ट्रपती राजपथ येथे ध्वज फडकवतात. कारण राष्ट्रपती हा घटनात्मक प्रमुख असतो. २६ जानेवारी १९५० रोजी संविधान अंमलात आले, म्हणून राष्ट्रपती प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहण करतात.



याआधी स्वतंत्र भारताला राज्यघटना किंवा राष्ट्रपती नव्हते. २६ जानेवारी १९५० रोजी जेव्हा स्वतंत्र भारताची राज्यघटना लागू झाली, तेव्हा राजपथवर पहिला प्रजासत्ताक दिन सोहळा आयोजित करण्यात आला होता. नंतरच्या काळात काही वेगवेगळ्या ठिकाणी प्रजासत्ताक दिनाचे आयोजनही करण्यात आले.

पंतप्रधान आणि राष्ट्रपतींचे अभिभाषण होते.

१५ऑगस्ट रोजी पंतप्रधान लाल किल्ल्यावरून देशाला संबोधित करतात तर १४ ऑगस्टच्या संध्याकाळी राष्ट्रपती राष्ट्राला संबोधित करतात. प्रजासत्ताक दिनानिमित्त कोणीही संबोधित करत नाही.

१५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी हे देशाच्या इतिहासातील सर्वात महत्त्वाचे दिवस आहेत. देशाची राजधानी दिल्लीत सरकारी पातळीवर दोन्ही दिवशी मोठ्या थाटामाटात सार्वजनिक कार्यक्रम आयोजित केले जातात. देशाच्या इतर भागात आणि सर्व राज्यांमध्येही यानिमित्ताने अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात. या कार्यक्रमांमध्ये काही मूलभूत फरक आहेत. १५ ऑगस्टला पदपथ संचलन नसते, तर २६ जानेवारीला भारताचा सामाजिक व सांस्कृतिक वारसा दर्शवणारे देखावे दिल्लीच्या 'कर्तव्यपथ' या मोठ्या मैदानावर सादर होतात. सैनिक, निमलष्करी इत्यादींची फार मोठे पदपथसंचलन होते. यामध्ये सुंदर रथ प्रदर्शन, कार्नेव्हल्स्, देशाच्या विविध राज्यातील महत्व सांगणारे सुंदर देखावे अशा कार्यक्रमांचाही समावेश आहे. प्रजासत्ताक दिनाच्या या खास सोहळ्याद्वारे, देश पाण्यात, जमीनीवर आणि आकाशात आपल्या लष्करी सामर्थ्याची आणि संस्कृतीची झलक दाखवतो.

२६ जानेवारीच्या कार्यक्रमात कोणत्या ना कोणत्या राष्ट्राच्या राष्ट्रप्रमुखाला प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित केले जाते. यामध्ये देशाच्या मित्र राष्ट्रांच्या राष्ट्राध्यक्षांना किंवा इतर कोणत्याही विशेष पाहुण्याला बोलावले जाते. इतर राष्ट्रांव्यतिरिक्त, इतर अनेक विशेष पाहुण्यांना देखील आमंत्रित केले जाते.

१५ ऑगस्टच्या कार्यक्रमात फारसे विशेष कार्यक्रम नसतात त्यामुळे बाहेरून कोणत्याही प्रमुख पाहुण्याला बोलावले जात नाही.

२६जानेवारी १९५० रोजी नव्याने स्वातंत्र्य मिळालेल्या भारत देशाने संविधानाचा स्वीकार करून लोकशाहीतील एका नव्या पर्वाची सुरुवात केली होती. लोकशाही म्हणजे लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालविलेले राज्य. थोडक्यात या दिवसापासून भारतीय जनतेला राज्य चालविण्याचा अधिकार मिळाला. प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला म्हणजेच २५ डिसेंबरला संध्याकाळी भारताचे राष्ट्रपती प्रतिष्ठित व्यक्तींना अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करतात, ज्यात पद्म पुरस्कारांचा समावेश आहे, जे राष्ट्रासाठी महत्त्वपूर्ण योगदान करतात.

दरवर्षी या दिवशी, भारतात राष्ट्रीय सुट्टी घोषित असते. पण सुट्टी म्हणजे फक्त आराम करणे, एन्जॉय करणे यासाठी न घालवता उलट या दिवशी तरी किमान आपल्या देशासाठी म्हणून प्रत्येकाने काहीतरी राष्ट्रहिताचे काम करावे. मग त्यात वृक्षारोपण करणे, नदी नाले किंवा रस्ते साफसफाई करणे, वाहतुकीची कोंडी सोडवण्यासाठी मदत करणे, गरजू व्यक्तींना लागेल ती, जमेल ती जास्तीत जास्त मदत करणे अशी कित्तीतरी कामे करून आत्मिक समाधान मिळवावे. आणि समाजाचे अल्प का होईना ऋण फेडावे. असे मला मनापासून वाटते.

**– सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे**

## प्रगत भारत..



बलशाली हा भारत
करी विश्वाचे सारथ
विश्वास दृढ मनात
लोकशाही सुदृढरथ

अनुभवाचे बोल ते
इतिहास ये सांगत
पुर्वजआशीषसहीत
विज्ञानाची घे संगत

धावाया लागे आज
काल होतो रांगत
भारत केवढा प्रगत
पाहे तारांगण पंगत

राही जागृत जागत
ना होणारं फसगत
सापांशीखेळण्याची
कला आहे अवगत

एकला होतो चालत
डोळ्यां कुणा सलत
आम्ही निघालो पुढे
वाईट त्यांची हालत

अमृतवर्षानुभव असे
सततप्रयास भगिरत
शिखरे गाठतो प्रगत
दमदार चालेअविरत


जे जे करती संगत
शत्रुचेहीअसे स्वागत
इच्छामनी हीचं असे
प्रगत हो सारे जगत

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक बातमी, वेचक बातमी

# देश बलशाली होईल !

स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन हे आपले दोन राष्ट्रीय सण आहेत. हे दोन्ही सण संपूर्ण भारतात मोठया उत्साहात साजरे केले जातात. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वच जण या दिवशी तिरंग्यांला मानवंदना देऊन देशाप्रती कृतज्ञता व्यक्त करीत असतात ; पण दुर्दैवाने अनेक लोकांना स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिन यातील फरक सांगता येत नाही.



भारताला ब्रिटिश राजवटीपासून १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले. देश स्वातंत्र्य झाला तेंव्हा आपल्या देशाला स्वतःचे संविधान नव्हते भारताचे कायदे हे भारतीय राज्य शासनाच्या १९३५ सालच्या कायद्यावर (कलमावर) आधारित होते. स्वतंत्र देशाला स्वतःचे संविधान असावे. त्या संविधानात देशाचा कारभार कसा चालवायचा या संबंधी नियम आणि कायदे असावेत तसेच नागरिकांचे हक्क आणि कर्तव्याचा देखील त्यात समावेश असावा असे सर्वांचे मत होते. हे संविधान तयार करण्याचे शिवधनुष्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारख्या विद्वानाने पेलावे असे असे आव्हान करण्यात आले. तेंव्हा ते संविधान तयार करण्याचे आव्हान डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वीकारले. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र भारताचे संविधान तयार करण्यासाठी मसुदा समिती स्थापन करण्यात समिती नेमण्यात आली. या समितीने संविधानाचा मसुदा तयार करून तो सभेपुढे ४ नोव्हेंबर १९४७ रोजी सादर केला. या सभेने सार्वजनिक चर्चेसाठी सभागृहात हा प्रस्ताव १६६ दिवस खुला केला.

डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या नेतृत्वाखालील या समितीने दोन वर्ष अकरा महिने अठरा दिवसात संविधानाचा मसुदा तयार केला. बरेचसे विमर्श आणि सुधारणा केल्यानंतर २४ जानेवारी १९५० रोजी विधानसभेच्या ३०८ सदस्यांनी हा मसुदा मान्य केला. संविधानाच्या दोन हस्तलिखित प्रति तयार करण्यात आल्या. इंग्रजी व हिंदी भाषेत या प्रति होत्या. दोन दिवसांनी म्हणजे २६ जानेवारी १९५० पासून या संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली आणि भारत प्रजासत्ताक राष्ट्र बनले. संविधानेने आपल्याला मूलभूत हक्कांसोबत मूलभूत कर्तव्ये देखील दिली आहेत. हक्क आणि कर्तव्ये एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आपण जितके हक्कांबाबत जागरूक असतो तितके आपण आपल्या कर्तव्याबाबत जागरूक नसतो. जर प्रत्येक नागरिकाने आपल्या संवैधानिक हक्कांसोबत संवैधानिक कर्तव्ये देखील प्रामाणिकपणे बजावली तरच भारत बलशाली होईल.

**– श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# वाचक पत्र



## तिरंग्याचा सन्मान राखला जावा !

स्वातंत्र्यदिन आणि प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने भारतीयांचे देशप्रेम कमालीचे जागृत होते. जागृत झालेले देशप्रेम सोशल मीडियावर किंवा अन्य ठिकाणी व्यक्त करताना अनावधानाने राष्ट्रध्वजाचा अवमानही होतो. राष्ट्रध्वजाचा सन्मान राखण्यासंदर्भात शासनाच्या वतीने प्रतिवर्षी ध्वजसंहिता प्रकाशित करण्यात येते मात्र ती वाचण्याची तसदी आपण कधी घेत नाही. सनातन संस्था आणि हिंदू जनजागृती समिती यांसारख्या राष्ट्रप्रेमी संघटना प्रतिवर्षी राष्ट्रीय सणांच्या निमित्ताने एक महिना आधीपासूनच जनजागृती अभियान राबवते. या अंतर्गत संघटनांचे कार्यकर्ते अन्य राष्ट्रप्रेमी संघटनांना सोबत घेऊन राष्ट्रध्वजाचा सन्मान राखण्यासाठी जनतेमध्ये जागृती करण्यासाठी आणि राष्ट्रध्वजाचा अवमान करणाऱ्यांना कठोर शिक्षा करण्याबाबतचे निवेदन शासकीय-प्रशासकीय अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांना देतात.

शाळा, महाविद्यालये, उत्सव मंडळे यांमध्ये जाऊन राष्ट्रध्वजाचे महत्व समजावून सांगतात. भित्तीपत्रके तसेच होर्डिंग्सच्या माध्यमातून राष्ट्रध्वजाचा सन्मान राखण्याचे आवाहन करतात. प्लॅस्टिकच्या राष्ट्रध्वजावर बंदी आणण्याबाबत या संघटनांनी अनेक वर्षे शासनाचा पाठपुरावा केल्यानंतर केंद्रीय गृहमंत्रालयाने २०१४ मध्ये प्लॅस्टिकच्या राष्ट्रध्वजांवर बंदी आणण्याचा निर्णय घेतला. याशिवाय राष्ट्रीय सणांच्या निमित्ताने रस्त्यात इतस्ततः पडलेले राष्ट्रध्वज संस्थेचे साधक संकलित करून ते प्रशासकीय कार्यालयांत सुपूर्द करतात. अशा अनेक देशप्रेमी संघटना प्रतिवर्षी आपापल्या परीने राष्ट्रध्वजाचा सन्मान राखण्यासंदर्भात जनजागृती करत असतात. आपली राष्ट्रीय अस्मिता असलेल्या राष्ट्रध्वजाचा सन्मान कसा राखावा याबाबत आपल्याला दरवर्षी सांगावे लागते हे आपले दुर्दैव नव्हे का ? ज्या तिरंग्याच्या सन्मानार्थ क्रांतीकारकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, आपल्या घरादारांवर तुळशीपत्रे ठेवली, ज्या तिरंग्याच्या रक्षणासाठी प्राण तळहातावर घेऊन आपले सैनिक सीमेवर दिवसरात्र झटत असतात त्या तिरंग्याला प्राणपणाने जपण्याची वृत्ती आपण केव्हा जोपासणार आहोत ?

**– नरेश घरत, चेंबूर**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

### मोहेकर महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिन साजरा



**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.२५, धाराशिव :** शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयात राज्यशास्त्र विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दिनांक २५ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता, राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ.नामानंद साठे यांनी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त २५ जानेवारी १९५० स्थापन झालेल्या राष्ट्रीय निवडणूक आयोगाचे कार्य अधोरेखित केले. २५ जानेवारी २०११ पासून सुरू असलेल्या आजच्या १५ व्या राष्ट्रीय मतदार दिनाचे महत्व विध्यार्यांना सांगितले. तसेच १९५२ पासून झालेल्या लोकसभा निवडणुकीचा मागोवा घेत २०२४ साली झालेल्या १८ व्या लोकसभेच्या निवडणुकीत भारताने ९९ कोटी मतदार नोंदणीचा विश्वविक्रम केला व ६४ कोटी मतदारांनी मतदान केले. तसेच या निवडणुकीत सहभाग घेतलेल्या तरुण मतदार, महिला, अपंग, तृतीय पंथी व ८५ वर्षावरील वयोवृद्ध लोकांसाठी घरून मतदानाची केलेली सोय हे वेगळेपण त्यांनी विशद केले. तसेच त्यांनी मतदार जनजागृतीचीशपथ उपस्थितांना दिली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुनील पवार, ज्ञान प्रसारक मंडळाचे संचालक डॉ.डी.एस.जाधव, उपप्राचार्य प्रोफेसर. हेमंत भगवान, प्रोफेसर कमलाकर जाधव, प्रा.अप्पासाहेब मिटकरी व अंतर्गत गुणवत्ता कक्ष समन्वयक प्रा.अर्चना मुखेडकर, प्रोफेसर दादाराव गुंडरे, प्रोफेसर. दत्ता साकोळे, प्रोफेसर ज्ञानेश चिंते, डॉ.नागनाथ अदाटे, प्रा. विलास अडसूळ, प्रा.विलास जगताप, प्रा.शेळके, डॉ.हरिभाऊ पावडे, डॉ.शीकांत भोसले ,सहायक ग्रंथपाल अरविंद शिंदे,प्रा. दिपक वाळके, प्रा.सुशील जमाले, डॉ.समाधान चंदनशिवे,प्रा. तांबोळी, प्रा. सूरज गपाट,प्रा. शिंदे,विनोद खरात, साजिद शेख, संदीप सूर्यवंशी,व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी, डॉ.पल्लवी उंदरे, डॉ.संदीप महाजन, डॉ.राघवेंद्र ताटीपामुल तसेच प्राध्यापक आणि शिक्षेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वेस्टन ऑस्ट्रेलिया स्पर्धेत पोलीस अधिकाऱ्यांने मिळवले यश

### पोलीस विभागाकडून कौतुकाचा वर्षाव

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.२५, ठाणे :** उल्हासनगर १ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विष्णु नाथा ताम्हाणे व त्यांचे सातारा जिल्ह्यातील दोन सहकारी यांनी वेस्टर्न ऑस्ट्रेलिया येथे आयोजित आयर्न मॅन स्पर्धेत यश मिळवले. ताम्हणे यांच्या या कामगिरीबद्दल त्यांचे महाराष्ट्र पोलीस दलातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे या यशा बदल हार्दिक अभिनंदन करण्यात आले. वेस्टर्न ऑस्ट्रेलिया, बस्लटन येथे १ डिसेम्बर रोजी Ironman ही स्पर्धा vc आयोजित केली होती. सदर स्पर्धेत जगभरातून १ हजार ७०० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी १ हजार १०० स्पर्धकांनी ही स्पर्धा यशस्वीपणे पार पाडली. त्यामध्ये पुण्यातील जवळपास १४ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. पुण्यामध्ये यापूर्वी कार्यरत असलेले व सध्या ठाणे आयुक्तालय मधिल उल्हासनगर चे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विष्णु नाथा ताम्हाने वय ५६ वर्ष यांनी सहभाग घेतला होता. त्याचबरोबर त्यांचा मुलगा गौरंग ताम्हणे वय १८ वर्ष यांनी देखील यामध्ये सहभाग घेतला होता. सदर स्पर्धे दरम्यान थंडी ऊन,



वारा, पाऊस यामुळे मुलगा गौरांग ताम ाने या सदरची स्पर्धा अर्धवट सोडावी लागली. विष्णू ताम्हणे यांनी यापूर्वी अनेक अर्ध मॅरेथॉन व पूर्ण मॅरेथॉन मध्ये सहभाग घेतलेला आहे. विष्णू ताम्हणे यांनी ही स्पर्धा पूर्ण करणे म्हणजे माझी एकट्याची वैयक्तिक कामगिरी नसून माझे सहकारी पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी माझी कोचेस, कुटुंब अशा सर्वांची मिळून सांघिक कामगिरी आहे. त्याचप्रमाणे सदरची कामगिरी संपूर्ण पोलीस दलासाठी गौरवशाली बाब आहे अशा प्रकारे आपल्या विजया बद्दलच्या भावना व्यक्त केल्या. आयर्न मॅन स्पर्धेत ३.८ किलो जलतरण , १८० किमी सायकलिंग आणि ४२.२ किमी धावणे हे सलग १७ तासामध्ये पूर्ण करणे आवश्यक असते. ते करत असताना स्पर्धकाच्या मानसिक आणि शारीरिक क्षमतेचा कस लागतो. या स्पर्धेचे ध्येय वाक्य एवरीथिंग इज पॉसिबल हे आहे. त्या अर्थाने स्पर्धक हा कोणत्याही वयामध्ये ही कामगिरी करू शकतो. यामधूनच प्रेरणा घेऊन विष्णू ताम्हणे यांनी वयाच्या ५६ व्या वर्षी त्यांचे सहकारी विजय अनपट यांच्या मदतीने पार पाडून समाजातील नागरिकांना व मुलांना तसेच पोलीस दलातील अधिकारी अंमलदार यांच्यासाठी प्रेरणा दिली आहे. विष्णू ताम्हणे हे आसूं ता फलटन येथील राहणारे आहेत. या काम गिरी त्यांच्या गावासाठी, जिल्ह्यासाठी व पोलीस दलासाठी अभिमानाची गोष्ट आहे. त्यांनी आपल्या कर्तृत्वाने शारीरिक व मानसिक तंदुरुस्तीसाठी पोलीस दलातील बांधवांसाठी एक नवा आदर्श निर्माण केला आहे. धैर्य, संयम, नियोजन आणि शिस्त यातून आपले इच्छित ध्येय गाठने शक्य होते. हे त्यांनी आयर्न मॅन स्पर्धा जिंकून सिद्ध केले आहे.

ताम्हाणे यांनी यापूर्वी नागरिक व पोलीस मध्ये शारीरिक तंदुरुस्ती साठी पुणे येथे असतानापोलीस दला मध्ये मॅरेथॉन सारख्या स्पर्धा चे आयोजन केले होते त्याच प्रमाणे त्यांनी पोलीसचे तंदुरुस्ती साठी मुंढवा व समर्थ पोलीस स्टेशन ला सायकल पेट्रोलिंग सुरू केले. विष्णू ताम्हणे यांना सदर स्पर्धेत स्विमिंग कामी संजीवन वालावलकर, रनिंग व सायकलिंगसाठी चैतन्य वेल्हाळ, स्ट्रेंथ ट्रेनिंगसाठी विजय गायकवाड यांनी मार्गदर्शन केलेले आहे. त्याचबरोबर त्यांचे कुटुंब व पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी, सहकारी यांनी देखील मोलाची साथ दिली असल्याने त्यांना हे यश गाठणे शक्य झाले आहे. IRONMAN स्पर्धेत सहभागी होणेसाठी ताम्हाणे यांना सतत प्रोत्साहन देणारे व सहकार्य करणारे तसेच स्पर्धेत सहभागी होनेसाठी परवानगी देणारे ठाणे शहर चे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे व त्यांचे सहकारी यांचे देखील या काम गिरी बद्दल अभिनंदन. ठाणे आयुक्तालय मधील पोलीस निरीक्षक विष्णू ताम्हाणे यांचे व ठाणे आयुक्तालय यांचे या जागतिक पातळीवरील कामगिरी बद्दल पोलिस दल व नागरिकांमधून विशेष कौतुक होत आहे.

### मोफत पीयुसी चाचणी कॅम्पचे आयोजन



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२५, अंबरनाथ :** रोटरी क्लब ऑफ अंबरनाथ स्मार्ट सिटीच्या वतीने वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय पुराणिक यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवार, दिनांक २५ जानेवारी २०२५ रोजी अंबरनाथ पूर्व येथील वेल्फेअर सेंटरमध्ये मोफत पीयुसी चाचणी कॅम्पचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाद्वारे वाहनचालकांचे आरोग्य तपासून रस्ता सुरक्षेसाठी जागरूकता निर्माण करणे, हा कॅम्पचा मुख्य उद्देश होता. यात अनेक वाहन परवाना धारकांनी सहभाग घेत फ्री पीयुसी चाचणीचा लाभ घेतला. या कॅम्पमध्ये माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे अंबरनाथ तालुका अध्यक्ष आशिष देशपांडे, त्यांचे सहकारी सुखदेव डोंगरे तसेच रयत वाहतूक संघटनेचे स्टँड प्रमुख अमोल अभिमन्यू ऐतनबोने, मोहन लालजी साबळे यांसह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले. या कॅम्पमुळे नागरिकांमध्ये आरोग्याचे महत्त्व पटले असून रस्ता सुरक्षेसाठी नेहमी सजग राहण्याची सूचना करण्यात आली. स्थानिक रहिवाशांसाठी अशा प्रकारचे मोफत उपक्रम फायदेशीर ठरत असल्याचे दिसून आले.रोटरी क्लबच्या वतीने सांगण्यात आले की, समाजाच्या आरोग्यासाठी व सुरक्षित रस्ते प्रवासासाठी अशा उपक्रमांचे आयोजन सातत्याने करणे गरजेचे आहे.

## केंद्राप्रमाणे सेवानिवृत्तांना दरमहा १ हजार वैद्यकीय मदत देण्याची मागणी

### सेवानिवृत्त शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी संघटनेच्या शिष्टमंडळाला दिल्लीत घेऊन जाणार - खा.लंके

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, अहिल्यानगर :** शिक्षकाचा मुलगा असल्याचा अभिमान असून शिक्षकांच्या शिस्तीत व संस्कारात घडलो आहे. सेवानिवृत्त शिक्षकांना न्याय देऊ शकलो नाही, तर त्या राजकीय पदावर राहण्याचा मला अधिकार नाही. सेवानिवृत्त शिक्षकांचे प्रश्न केंद्र स्तरावर सोडविण्यासाठी संघटनेच्या शिष्टमंडळाला दिल्लीत घेऊन जावून केंद्रीय अर्थमंत्री यांच्यासह चर्चा घडवून आणण्याचे आश्वासन खासदार निलेश लंके यांनी दिले.

सेवानिवृत्त शिक्षकांची संघटना असलेल्या अहिल्यानगर पेन्शनर्स असोसिएशनच्या त्रैवार्षिक अधिवेशनाच्या उद्घाटनाप्रसंगी खासदार लंके बोलत होते.

शहरातील टिळक रोड, लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशनचे अध्यक्ष एन.डी. मारणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या अधिवेशनाप्रसंगी जि.प. प्राथमिकचे शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव लामखडे, राज्य सचिव नामदेवराव घुगे, नगर जिल्हाध्यक्ष द.मा. ठुबे, सरचिटणीस बन्सी उबाळे, अशोक ढसाळ, वि.नी. कोल्हे, अधोक धासळ, महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशनचे वसंतराव



सबनीस, अनंतराव पाटील, म.रा. सोनवणे, वारे, मधुकर साबळे, डी. आर. पाटील आदींसह पदाधिकारी व सेवानिवृत्त शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे खासदार लंके म्हणाले की, समाज घडविणारे शिक्षक सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांचे प्रश्न सोडविणे हे सर्वांचे कर्तव्य आहे.

संघटनेचे शिष्टमंडळ, खासदार शरद पवार व सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली सेवानिवृत्तांच्या प्रश्नावर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन मंची भेट घेण्याचे खासदार निलेश लंके यांनी स्पष्ट केले.

### मतिमंद, अंध मुलांची शाळेत मोफत बालनेत्र तपासणी शिबिर संपन्न



**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.२५, जव्हार (पालघर) :** जव्हार येथील गुलमोहर मतिमंद व अंध मुलांची शाळेत एच.व्ही.देसाई नेत्र रूग्णालय पुणे व प्रोजेक्ट प्रकाश चॅरिटेबल ट्रस्ट दिल्ली यांचे संयुक्त विद्यमाने अंध मुलांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. तसेच शिबीरामध्ये एकूण १७ विद्यार्थ्यांची तिरळेपणा व मोतीबिंदू तपासणी झाली. त्यामधे दोन मुलांना मोतीबिदू आढळून आला असून त्यांना पुढील तपासणी साठी रेफर करण्यात आले. प्रोजेक्ट प्रकाश चे प्रकल्प समन्वयक शशिकांत भिसे यांनी प्रकल्पाची माहिती देवून मार्गदर्शन केले. अंध शाळेच्या संस्थापिका प्रमिलाताई कोकड यांनी अशा उपक्रमाची गरज असून अंध मुलांची मोफत नेत्र तपासणी कलेबद्दल प्रोजेक्ट प्रकाश च्या टीम चे आभार व्यक्त केले. सदर शिबीराचे आयोजनासाठी अस्मिता प्रतिष्ठान दाभलोनचे संस्थापकीय अध्यक्ष सुदाम उंबरसाडा यांनी सहकार्य केले असून मोफत बालनेत्र तपासणी शिबिर संपन्न झाले.

## ठेकेदाराने माजी सरपंचाच्या श्रीमुखात लगावली; जिल्हा परिषदेतील घटना

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, अहिल्यानगर :** पारनेर तालुक्यातील जलजीवन योजनेच्या अपूर्ण कामाच्या आढावा बैठकीदरम्यान ठेकेदार आणि माजी सरपंच तथा ग्रामपंचायत सदस्य यांच्यात बाचाबाची होवून चिडलेल्या ठेकेदाराने ग्रामपंचायत सदस्याच्या थेट कानाखाली ठेवून दिली. हा प्रकार इतका अचानक घडला की उपस्थित अधिकाऱ्यांची देखील यावेळी भंबेरी उडाली.

दरम्यान या घटनेनंतर पाणीपुरवठा विभागाने घडलेल्या प्रकाराबाबत कानावर हात ठेवत बैठकीत काही लोकांमध्ये वादावादी झाली. मात्र वाद घालणारे ते कोण होते, माहीत नसल्याचे सांगत घडलेल्या प्रकारापासून स्वतःला लांब ठेवण्याचा प्रयत्न केला. पारनेर तालुक्यातील जलजीवन योजनेतील कामाचा आढावा घेण्यासाठी, रखडलेली कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभाग, पारनेर पंचायत समिती पाणी पुरवठा विभाग यांनी नगरला जिल्हा परिषदेच्या मुख्यालयात शुक्रवारी दुपारी आढावा बैठकीचे आयोजन केले होते.

यावेळी पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता एच.बी.चव्हाण यांच्यासह तालुका पातळीवरील पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी, जलजीवन पाणी योजना अपूर्ण असणाऱ्या गावातील सरपंच यांच्यासह ठेकेदार उपस्थित होते. बैठकीत पारनेर तालुक्यातील एका गावाच्या जलजीवन योजनेचा आढावा सुरू होता. यावेळी संबंधित गावचे माजी सरपंच तथा विद्यमान सदस्य आणि पाणी योजनेचा ठेका घेतलेला ठेकेदार आणि त्यांचे सहकारी हजर होते. बैठकीत संबंधीत गावातील जलजीवन पाणी योजनेचा आढावा सुरू असतांना ठेकेदार आणि संबंधित ग्रामपंचायत सदस्य यांच्या अपूर्ण कामावरून हमरी-तूमरी झाली. एकमेकांनी पाणी योजना अपूर्ण असल्याचे कारण पुढे केले. सुरुवातीला गरमागरम सुरू असणारी ही चर्चा अखेरच्या टप्प्यात पोचली त्यावेळी

> आधीच पारनेर तालुक्यातील जलजीवन योजनेच्या कामाबाबत तक्रारी असताना आता ठेकेदार आणि ग्रामपंचायत सदस्यात हाणामारी झाल्याने त्याचे पडसाद तालुक्यात उमटणार आहे. आढावा घेण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्यालयात तालुक्यातील सरपंच आणि ठेकेदार यांची बैठक बोलवण्यात आली. यावेळी अपूर्ण कामावरून काही लोकांमध्ये वाद झाले. वाद घालणारे कोण होते, हे ओळखत नाही. झालेला वाद हा आप आपसातील असण्याची शक्यता आहे.
>
> **- एच.बी.चव्हाण (कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, अहिल्यानगर)**

संतप्त झालेल्या ठेकेदाराने थेट ग्रामपंचायत पदाधिकाऱ्याच्या श्रीमुखात भडकावली. बैठकीत घडलेला प्रकार अनपेक्षित असल्याने सुरुवातीला काय झाले हे कोणालाच समजले नाही.

मात्र प्रकरण हातघाईवर आल्याचे पाहताच अधिकारीही थरथरले. बैठकीत हजर असणाऱ्यांपैकी काहींनी पुढे होत ठेकेदार आणि सदस्य यांना बाजूला नेण्याचा प्रयत्न केला. यावेळी दोघांनी एकमेकांच्या डोक्यात खुर्ची घालण्याचा प्रयत्न केला. या प्रकारामुळे गडबडलेल्या अधिकाऱ्यांनी बैठक आखडती घेतली. काही वेळाने तणाव निवळ्यानंतर सर्वजण निघून गेले. दरम्यान याबाबत जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभागाशी संपर्क केला असता, जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभागाशी या वादाचा संबंध नाही, संबंधित गावात असणाऱ्या वादाचे पडसाद बैठकीत उमटले,असे सांगत हात झटकले. दरम्यान या घटनेनंतर जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागात शांतता होती. बाहेरच्या लोकांचे वाद जिल्हा परिषदेत घडल्याने पुन्हा जिल्हा परिषदेची बदनामी होणार अशी भावना काहींनी यावेळी व्यक्त केली.

### भारती मोहिते-पाटील यांचा राज्यस्तरीय आदर्श गुणवंत मुख्याध्यापिका पुरस्काराने सन्मान



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२५, पंढरपूर :** क्रांतीसुर्य महात्मा फुले-क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय आदर्श गुणवंत मुख्याध्यापिका या राज्यस्तरीय पुरस्काराने भारतीताई मोहिते-पाटील यांना सन्मानित करण्यात आले. भारतीताई मधुसूदनजी मोहिते-पाटील (मुख्याध्यापिका-गाडगे महाराज माध्य. आश्रम शाळा, ब्रह्मपुरी ता.कोरेगाव जि.सातारा) यांना महात्मा फुले इतिहास अकादमी-पुणे यांच्या वतीने देण्यात येणारा क्रांतीसुर्य महात्मा फुले-क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय आदर्श गुणवंत मुख्याध्यापिका पुरस्कार युवराज छत्रपती संभाजी महाराज (कोल्हापूर) यांचे हस्ते प्रदान करण्यात आला. कार्यक्रम प्रसंगी रावसाहेब मिरगण (शिक्षण निरीक्षक- महाराष्ट्र राज्य-पुणे), मधुसुदनजी मोहिते-पाटील (चेअरमन-गाडगे महाराज मिशन-मुंबई), आ.दत्तात्रय सावंत (आमदार-पुणे विभाग-पुणे) व महात्मा फुले अकादमीचे सर्व पदाधिकारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## सारथी सुरक्षा सेनेचे परिवहन भ्रष्टाचार विरोधी आंदोलन

**अक्षराज : महादेव चव्हाण**

**दि.२५, ठाणे (नवी मुंबई) :** सिबिडी, बेलापूर येथे रस्ता सुरक्षा जनजागृती अभियान २०२५ चे अंतर्गत परिवहन विभाग नवी मुंबई उपपदेशिक परिवहन कार्यालय यांच्या वतीने क्रिकेट स्पर्धांचे आयोजन राजीव गांधी स्टेडियम या ठिकाणी करण्यात आलेले होते. या कार्यक्रमात ठिकाणी रस्ता सुरक्षा या विषयावरती काम करणारे सारथी सुरक्षा सेवा संस्थेचे प्रवक्ते विनय मोरे व त्यांच्यासोबत त्यांचे सहकारी कार्यकर्ते यांनी त्या ठिकाणी निदर्शन पर आंदोलने केले. परिवहन विभागाने किमान वाहन परवाने देताना भ्रष्टाचार करू नये व अपघात रोखण्यास मदत करावी. अशा प्रकारचा आव्हान परिवहन विभागातील उपस्थित असणारे अधिकारी कर्मचारी यांना फलक दाखवून अशाप्रकारे विनंती करण्यात आली.

परिवार विभागाने राजीव गांधी स्टेडियम येथे ठेवलेल्या क्रिकेट स्पर्धेमुळे प्रचंड मोठ्या प्रमाणामध्ये त्या ठिकाणी वाहतुकीस अडथळा निर्माण झालेला होता. कारण त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे नियोजन नव्हते. कारण आजच्या दिवशीच त्या ठिकाणी शनिवारचा बाजार देखील राजीव गांधी स्टेडियमच्या बाहेरच्या बाजूला भरतो. त्यामुळे नागरिकांमध्ये प्रश्न उपस्थित झालेला होता की लोकांना नियम शिकवायला आलेले स्वतः नियमांचे प्रथमता पालन करा. बेशिस्तपणे कशाही प्रकारे कुठेही गाड्या त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी क्रिकेट स्पर्धांसाठी आलेल्या खेळाडूंनी पार्क केलेल्या होत्या. त्यामुळे सीबीडीतील नागरिकांना देखील याचा नाहक त्रास सहन करावा लागला. तसा त्यांनी याबद्दल खेद व्यक्त केला.

# साप्ताहिक राशिफल २६ जानेवारी ते ०२ फेब्रुवारी २०२५



**मेष रास –** या सप्ताहात राहू हा ग्रह तुमच्या चंद्र राशीपासून बाराव्या भावात असणार आहे. त्यामुळे या सप्ताहात तुमची ऊर्जा वाढेल व कामाचा कितीही ताण असला तरीही तुम्ही ते आनंदाने पार पाडाल. या सप्ताहात परिवारातील वातावरणही खूप आनंदी असेल. तुमच्यातील कलागुण, हुनर लोकांच्या नजरेत येईल व ते तुमचे कौतुक करतील. खूप छान धनलाभ होण्याची शक्यता आहे. तुमच्यावर कुठलेही संकट आले तरी तुमचा जीवनसाथी तुम्हाला त्या संकटातून बाहेर काढेल. तुमचे जुने आप्तेष्ट अथवा जुन्या ओळखीतील मित्र तुम्हाला भेटतील. तुमच्या कार्यक्षेत्रातही तुम्ही तुमच्या कामाचा प्रभाव पाडाल. त्यामुळे तुमचे शत्रू देखील तुमची वाहवा करतील.

**उपाय –** रोज ॐ भौमाय नमः असा जप २१ वेळा करणे

**वृषभ रास–** या सप्ताहात गुरु हा ग्रह तुमच्या लग्न भावात असणार आहे त्यामुळे तुमचे स्वास्थ्य या सप्ताहात नक्कीच उत्तम राहील. पण या सप्ताहात तुमचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता देखील आहे म्हणून दुसऱ्यांचे म्हणणे ऐकून गुंतवणूक करू नका. तसेच तुमच्यामुळेच घरातील वातावरण आनंदी व खुशिचे असेल. या सप्ताहात तुमच्या घरी तुमचे नातेवाईक अथवा मित्र पाहुणे म्हणून येतील. त्यांच्यासोबत तुमचा खूप छान वेळ जाईल. तुमच्या कार्यालयातही या सप्ताहात स्नेहपूर्ण व सकारात्मक वातावरण असेल. त्यामुळे तुम्ही हाती घेतलेले महत्त्वाचे कार्य पूर्ण करू शकाल.

**उपाय –** रोज ललिता सहस्त्रनामाचा पाठ करणे.

**मिथुन रास –** या सप्ताहात राहू हा ग्रह तुमच्या दशम स्थानात असणार आहे. त्यामुळे या सप्ताहात तुमचे स्वास्थ्य एकदम निरोगी राहील. आर्थिक दृष्ट्या ही हा सप्ताह खूप उत्तम आहे. धनवृद्धी होईल. या सप्ताहात पुन्हा तुम्हाला तुमच्या आई-वडिलांच्या तब्येतीची काळजी घेणे जरुरीचे आहे. तुमच्या कार्यक्षेत्रात तुमच्या कार्यात अडथळे आणणारे लोकच आता मागे पडतील. त्यामुळे तुमचे मनोबल व मनोधैर्य वाढेल आत्मविश्वास वाढेल. तुमच्या कामातही तेजी येईल. विद्यार्थ्यांचा मात्र आत्मविश्वास घटेल. अभ्यासात अजिबात लक्ष लागणार नाही.

**उपाय –** मंगळवारी केतू ग्रहाचे दर्शन घेणे.

**कर्क रास –** या सप्ताहात गुरु हा ग्रह तुमच्या नवमस्थानात असणार आहे. त्यामुळे तुम्हाला तुमच्या सर्व कार्यात यश मिळेल. तुम्हाला तुमची सर्व कामे करून भरपूर मोकळा वेळही मिळेल. त्याच वेळात तुम्ही तुमचा एखादा छंद जोपासू शकाल. त्यामुळे तुम्ही खुश व आनंदी असाल. धनवृद्धी होईल. कोर्टाच्या कामातही तुम्हाला यश मिळेल. तुमच्या हातून एखादे समाज उपयोगी कार्य देखील घडेल त्याने समाजात तुमची पत, प्रतिष्ठा, मान यात वृद्धी होईल. हातून एखादे धार्मिक कार्यही घडेल. तुमच्या कार्यात येणारे सर्व अडथळे दूर होतील, व एखादी सुंदर घटना तुमच्या आयुष्यात घडेल ज्याची खूप दिवसांपासून तुम्ही वाट पाहत होतात. या सप्ताहात विद्यार्थ्यांच्या पदरी मात्र निराशाच येणार आहे.

**उपाय –** शनिवारी राहू ग्रहाचे दर्शन घेणे.

**सिंह रास –** या सप्ताहात तुम्हाला पोटाचे विकार जाणवू लागतील म्हणून तुमच्या खाण्यापिण्याच्या सवयींवर नियंत्रण ठेवा. योगाभ्यास तथा व्यायाम करावा. स्वभावात रागाचे प्रमाण वाढेल. घरातील मंडळींशीच तुमचे वाद-विवाद संभवतात, त्यामुळे घरातील वातावरण दूषित होईल. लघु व्यवसाय करणाऱ्यांना धंद्यात नुकसान संभवते. तसे असूनही मेहनत मात्र करावीच लागेल. विद्यार्थ्यांनाही त्यांच्या अभ्यासात अनेक अडचणी येतील, तणाव वाढेल.

**उपाय –** रोज ॐ भास्कराय नमः असा जप अकरा वेळा करणे.

**कन्या रास –** या सप्ताहात तुमच्या सहाव्या भावात शनिदेव असणार आहेत. त्यामुळे तुमचे शारीरिक स्वास्थ्य एकदम छान व उत्तम राहील. तुमचे मानसिक स्वास्थ्य ही छान राहील. या सप्ताहात तुम्ही धनसंचय यही करू शकाल. पण काही कारणास्तव तुम्हाला बेचैनी येईल व परिवारातील मंडळींकडे लक्ष द्यावे लागेल. आपल्याला वाटते तेच घडत असते असे नेहमी होत नसते असा प्रत्यय या सप्ताहात तुम्हाला येईल. त्यामुळे कोणाकडूनही खूप अपेक्षा ठेवू नका. विदेशात शिक्षणासाठी जाण्याचे योग आहेत एकंदरीत सप्ताह छान राहील.

**उपाय –** ओम बुधाय नमः असा जप रोज ४१ वेळा करणे.

**तुला रास –** या सप्ताहात राहू हा ग्रह तुमच्या लग्न स्थानापासून १२ व्या स्थानात असणार आहे. त्यामुळे तुम्हाला भायाची साथ नक्कीच मिळेल. तुमच्यावर आलेल्या संकटांवर तुम्ही मात करू शकाल. हा सप्ताह सकारात्मक व सफलता पूर्ण असेल. आरोग्याच्या दृष्टीने मात्र सप्ताह थोडासा त्रासदायक ठरेल, पण त्या दृष्टीने नियमित व्यायाम करा. परिवारातील लोकांसाठी तुमचा खर्च होईल पण त्यामुळे आनंदही तुम्हाला मिळेल. त्यानंतर आर्थिक तंगी जाणवेल. पण तेही लवकरच संपुष्टात येईल. आपल्या कुटुंबातील लहान मुलांची प्रेमाने वागा.

**उपाय –** मंगळवारी केतू ग्रहाचे दर्शन घ्या.

**वृश्चिक रास –** या सप्ताहात तुमच्या लग्न स्थानापासून सप्तम भावात गुरू असणार आहे. त्यामुळे तुमच्या हातून तुमच्या कुटुंबासाठी, घरासाठी काही खरेदी तुम्ही कराल. त्यामुळे तुमच्या घरातील व्यक्ती तुमच्यावर खुश असतील एखादा छोटा प्रवास अथवा एखादी छोटी सहल या सप्ताहात तुम्ही करू शकाल. तुमच्या करिअरमध्येही तुमची प्रगती व उन्नती होईल यश मिळेल. पण त्यामुळे तुम्ही हुरळून जाऊ नका कारण तुम्ही भावनिक दृष्ट्या खूप संवेदनशील आहात. त्यामुळे धैर्याने घ्या घाई गडबडीत कुठलाही निर्णय घेऊ नका.

**उपाय –** रोज हनुमान चालीसाचा पाठ करणे.

**धनु रास –** या सप्ताहात तुमच्या लग्न स्थानापासून चौथ्या भावात राहू हा ग्रह असणार आहे. त्यामुळे तुमची मानसिक ताण तणावातून मुक्ती होणार आहे. पण त्यासाठी तुम्हाला योगाभ्यास करणे जरुरीचे आहे. पण या सप्ताहात आर्थिक देवाणघेवाण करू नये. तसेच तुमच्या सहाव्या भागात गुरु ग्रह असणार आहे. त्यामुळे तुम्ही या सप्ताहात सावध रहा कुठलेही गैरकानूनी काम करू नका. तसे झाल्यास परिवारात आनंदी आनंद असेल त्यामुळे तणावही कमी होईल. कामात तुम्हाला खूप मेहनत घ्यावी लागेल. तुमचे विरोधी ही या सप्ताहात षडयंत्र रचण्याचे काम करतील, त्यामुळे दूरदृष्टी ठेवा, लक्ष द्या,वाईट सवयी सोडा.

**उपाय –** रोज ओम दुर्गाय नमः असा अकरा वेळा जप करा.

**मकर रास –** या सप्ताहात तुमच्या पाचव्या भावात गुरु हा ग्रह असणार आहे. त्यामुळे तुमचा आत्मविश्वास व ऊर्जा प्रचंड वाढेल. खूप दिवसांपासून रखडलेली सगळी कामे आता पूर्ण होतील. त्यासाठी गरज असल्यास विश्वास पात्र लोकांचाच सल्ला घ्या. दुसऱ्यांकडे बघून त्यांचा अनुभव घेऊन तुमचा अनुभव ठरवा, व निर्णय घ्या. त्यामुळे सप्ताह तुम्हाला खूप छान जाईल. पण तुमच्या घरातील मंडळींना मात्र तुमचा त्रास होईल. परिवारात तणावपूर्ण वातावरण तयार होईल. तुमच्या घाणेरड्या सवयी बदला, कामात दक्षता घ्या. कामात एकाग्रता वाढवा. विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासात मात्र छान फळ मिळेल. प्रतिस्पर्ध्यावर मात करू शकाल, त्यामुळे तुमचा जीवनसाथी देखील आनंदी असेल. मित्रपरिवार जीवनसाथी अथवा तुमच्या आप्तेष्टांकडून तुम्हाला छोटेसे सरप्राईज देखील मिळेल.

**उपाय –** ओम सूर्याय नमः असा जप २१वेळा करणे.

**कुंभ रास –** या सप्ताहात तुमच्या लग्नस्थानापासून चौथ्या भावात गुरु हा ग्रह असणार आहे. त्यामुळे तुमचे खूप दिवसापासून चे पायाचे दुखणे आता थांबेल. धनप्राप्ती ही चांगली होईल. सप्ताह एकदम उत्तम आहे. शुद्ध विचाराच्या लोकांशीच व अनुभवी लोकांशीच मैत्री करा. प्रेमीजनांसाठी हा सप्ताह प्रतिकूल आहे. तुमच्या लग्न स्थानात शनि हा ग्रह असल्याने तुमच्यातील ऊर्जा थोडी कमी होईल. तुमच्यातील उत्साह कमी होईल. पण आधी कधीही न मिळालेली संधी आता तुम्हाला मिळेल, त्यामुळे तुमचा मान, सन्मान, पत यात वृद्धी होईल.

**उपाय –** शनिवारी अन्नदान करणे.

**मीन रास –** या सप्ताहात तुमच्या लग्नस्थानाध्येच राहू हा ग्रह असणार आहे. त्यामुळे अति खाणे टाळा. पोटदुखी, गॅस, फूड पॉइझन असे आजार संभवतात.तसेच शनि हा ग्रह तुमच्या लग्नस्थानापासून बारावा असणार आहे, त्यामुळे कोणाकडून उधार पैसे आधीच घेतले असेल तर ते या सप्ताहात तातडीने द्यावे लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे तुमचे बजेट हालेल, तणाव वाढेल. पण या सर्वांवर तुम्ही मात कराल. तुमच्या परिवारातील लोकांच्याच मदतीने घर खरेदी करण्याचे योग देखील आहेत. परंतु तुमच्यातील उत्साह कमी होईल. तरीही तुम्ही प्रतिस्पर्ध्यांवर मात करू शकाल त्यासाठी तुम्हाला वरिष्ठांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

**उपाय–** बृहस्पतीसाठी यज्ञ हवन करणे.

**- देवयानी कुलकर्णी.**
**खारघर (रायगड)**

# विंचूर येथील उपबाजार आवारात भुजबळ यांच्या हस्ते विविध विकास कामाचे भूमिपूजन

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२५, विंचूर (नाशिक) :** विंचूर उप-बाजार आवारात विविध विकासकामांचे आज भूमिपूजन केले. तसेच उपस्थित शेतकरी, व्यापारी व कामगार बांधवांशी माजी मंत्री छगनराव भुजबळ यांनी संवाद साधला. लासलगाव ही आशिया खंडातील सर्वात मोठी बाजार पेठ असून कांद्याच्या दराबाबत अनेक वेळा प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे कांदा शेतकऱ्यांना अधिक दर मिळण्यासाठी कांदा प्रक्रिया उद्योगाला चालना देण्याची नितांत आवश्यकता आहे. या प्रक्रिया उद्योगासाठी बाजार समितीने देखील लक्ष घालून या प्रकल्पाला चालना देण्याची गरज आहे, असे मत व्यक्त केले. दिवसेंदिवस विंचूर उपबाजार आवारावर शेतमाल आवकेत वाढ होत असल्याने बाजार समितीस सध्या असलेली जागा अपुरी पडत आहे. त्यामुळे बाजार समितीने सुभाषनगर शिवारातील ८ हेक्टर २१.२९ एकर जागा शासकीय



दराने संपादित करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. हा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहे. लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन हा प्रश्न लवकरच मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

केंद्र सरकारने कांद्यावर लादलेल्या २० टक्के निर्यात शुल्काचा परिणाम निर्यातीवर होत असून निर्यात शुल्क शून्य केल्यास त्याचा थेट फायदा शेतकऱ्यांना होणार आहे. यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल. कांद्याचे दर अनेकदा वरखाली होत असतात. कांदा शेतकऱ्यांनी आता पूरक व्यवसायाकडे देखील वळणे गरजेचे आहे. कांदा पावडरसारखा चांगला उद्योग शेतकरी बचत गटाच्या माध्यमातून केला तर इतर देशांमध्ये मोठी मागणी कांदा पावडरला आहे. याकडे या उद्योगाला चालना देण्यासाठी बाजार समितीने विशेष लक्ष देऊन प्रक्रिया उद्योगाला चालना द्यावी, अशी सूचना केली. लासलगाव बाजार समितीने राज्यातील ३०५ बाजार समित्यांमधून प्रथम क्रमांक पटकावलेला असून शेतकरी, मापारी, कामगार यांचे हित जपण्यासाठी सर्वांनी एकत्र राहून काम करावे, असे आवाहन संचालक मंडळाला केले.

यावेळी लासलगाव बाजार समितीचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपसभापती गणेश डोमाडे, संचालक पंढरीनाथ थोरे, डी.के.जगताप, जयदत्त होळकर, डॉ.श्रीकांत आवारे, राजेंद्र डोखळे, तानाजी आंधळे, भीमराज काळे, छबुराव जाधव, रमेश पालवे, राजेंद्र बोरगुडे, महेश पठाडे, तालुकाध्यक्ष भाऊसाहेब भवर, सरपंच सचिन दरेकर, दत्तूपंत डुकरे, बाळासाहेब पुंड, शिवाजी सुपणर, रामभाऊ जगताप, गोरख शिंदे, विलास गोरे, राजाराम मेमाणे, बबन शिंदे, नीरज भट्टड बाजार समिती सचिव नरेंद्र वाढवणे यांच्यासह पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

# थोडक्यात

## ठाकरे शिवसेनेचा पदाधिकारी मेळावा संपन्न

**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.२५, शहापूर (ठाणे) :** आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विचार विनिमय करण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शहापूर तालुका प्रमुख पदाधिकाऱ्यांचा मेळावा शनिवार, दिनांक २५ जानेवारी २०२५ रोजी धर्मवीर आनंद दिघे सभागृहात संपन्न झाला. यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी आगामी निवडणुका स्वबळावर लढवण्याची आग्रही मागणी केली असता उपनेते विश्वास थळे यांनी सर्व जागा स्वबळावर लढण्याची तयारी करण्याचे आवाहन केले. या मेळाव्यास भिवंडी लोकसभा संपर्क प्रमुख साईनाथ तारे, उपजिल्हा प्रमुख शंकर खाडे, विद्यार्थी सेनेचे प्रवीण पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी व्यासपीठावर महिला जिल्हा संघटक रश्मी निमसे, भिवंडी लोकसभा सहसंपर्क प्रमुख सोन्या पाटील, ज्येष्ठ नेते रमेश जगे, तालुका महिला संघटक गुलाब भेरे आदी मान्यवर उपस्थित होते. या मेळाव्याचे प्रास्ताविक तालुका प्रमुख कुलदीप धानके तर सूत्रसंचालन सचिव रवींद्र लकडे यांनी केले.

## ..अन्यथा फेब्रुवारीपासून संजय गांधी, श्रावण बाळचे अनुदान बंद !

### विशेष सहाय्यच्या अनुदानासाठी आता डीबीटी

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.२५, अहिल्यानगर :** विशेष सहाय्य कार्यक्रमार्तंगत संजय गांधी निराधार, श्रावणबाळ योजनेतील लाभार्थ्यांना अर्थसहाय्याचे वितरण डिसेंबर २०२४ पासून डीबीडीद्वारे सुरु झाले आहे. जानेवारी महिन्याचे थेट अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आले आहे. ज्यांचे बँक खाते आधार व मोबाईल नंबरशी संलग्न नाही, अशा लाभार्थ्यांचे अनुदान फेब्रुवारीपासून बंद होणार आहे. संजय गांधी, श्रावणबाळ योजनेतील वयोवृद्ध, आजारी, दिव्यांग व विधवा महिलांना मिळणारे अर्थसहाय्य तहसील कार्यालयामार्फत लाभार्थ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात येत होते. लाभार्थ्यांना अर्थसहायाचे वितरण जलदगतीने करणे व नागरिकांना मिळणार्या सेवा जास्त सुलभ करण्याच्या दृष्टीने योजनांचा लाभ डीबीटी पोर्टल द्वारे करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. यानुसार संजय गांधी निराधार, श्रावणबाळ योजनेतील लाभार्थ्यांना डिसेंबर २०२४ पासून डीबीटीद्वारे थेट अनुदान वाटपास सुरुवात केली आहे. जानेवारी महिन्याचे अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आले आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी इथून पुढे सर्व लाभार्थ्यांची उघडण्यात आलेली बँक खाती आधार व मोबाईल नंबरशी संलग्न असणे आवश्यक आहे. ज्यांचे बँक खाते संलग्न नाही. अशा लाभार्थ्यांना फेब्रुवारी २०२५ पासून लाभ बंद होणार आहे.

## राष्ट्रीय मतदार दिन विविध उपक्रमातून साजरा




**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२५, खंडाळा (सातारा) :** सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसिलदार खंडाळा अजित पाटील यांच्या सूचनेनुसार शनिवार, दिनांक २५ जानेवारी २०२५ रोजी पंधरावा राष्ट्रीय मतदार दिन सोहळा सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय, राजेंद्र विद्यालय व खंडाळा इंग्लिश मिडीयम स्कुल यांच्या संयुक्त विद्यमाने उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी निवडणूक नायब तहसीलदार दत्तात्रय गवारी, निवासी नायब तहसीलदार योगेश चंदनशिव, नायब तहसीलदार चेतन मोरे,निवडणूक शाखा विभागाचे नवहिल वराडे, दीपक चव्हाण, प्राचार्य शब्बीर नालबंद, प्राचार्य डॉ.ड़हणमंत जाधव व प्राचार्य जयवंत जगताप, उपप्राचार्य अरुंधती गाढवे, सुशिला मोहिते, डॉ.प्रतिभा पाटणे, राष्ट्रीय छात्र सेना वरिष्ठ अधिकारी व्ही.एन. गाढवे, नवनाथ पाचे, प्रा. प्रदीप बोरगावे, सोमनाथ गर्जे, वरिष्ठ महाविद्यालय प्राध्यापक यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मतदार प्रतिज्ञेचे सामूहिक वाचन करण्यात आले. यासोबत मतदार दिनानिमित्त महाविद्यालयीन स्तरीय निबंध व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली.निबंध स्पर्धेत प्रीती अर्जुन बी.एस्सी.-०१ प्रथम, पायल शेलार बीकॉम-०२ द्वितीय, दिव्या गायकवाड बीए-०३ तृतीय क्रमांक पटकवला चित्रकला स्पर्धेत रोशनी रामगुडे बीसीए -०३ प्रथम,रोहन जगताप बीसीए-०३ द्वितीय, ऋतुजा मोरे बी.ए-०२ तृतीय क्रमांक पटकवला. या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे प्रा.अमीर इनामदार,यशस्वी विद्यार्थ्यांचे खंडाळा विभाग शिक्षण समिती संस्थापक अध्यक्ष शंकरराव गाढवे, सचिव अनिरुद्ध गाढवे, सर्व संचालक मंडळ यांच्याकडून शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

## बुद्धा चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या वाटप

**अक्षराज : जे.के.पोळ**



**दि.२३, दिवा शहर (ठाणे) :** बुद्धा चेरिटेबल ट्रस्टच्या वतीने नुकतेच ठाणे महानगरपालिका शाळा क्रमांक ७९, दिवा शहर मध्ये सातवी, आठवी तथा नववीच्या विद्यार्थ्यांना नोटबुकचे वाटप करण्यात आले.

सदर कार्यक्रमात ट्रस्टचे अध्यक्ष राजेशचन्द्रा जैस्वार, मधुकर बनसोड, तसेच दीपक खंदारे उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रोहित जैस्वार, अजय तिवारी व सुमन देवी यांनी अथक परिश्रम घेतले.